# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा

**वर्ग : बी. एस्सी. प्रथम सत्र**

**विषय : मराठी**

## प्रश्नपत्रिका

---

**१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (३०० शब्दात)** **१२**

अ. तंत्रज्ञानाच्या अतिवापराचे दुष्परिणाम

ब. निसर्ग आणि मानव

**२. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा.** **१२**

आगरकरांनी वाचनाचे कोणते प्रकार सांगितले? ते सांगून त्यांचे महत्त्व आणि मर्यादा कशा स्पष्ट केल्या?

किंवा

श्रीनिवास ठाणेदार लिखित 'ही श्रीची इच्छा' या पाठातून त्यांच्या जीवनप्रवासाचे दर्शन कसे घडून येते?

**३. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा.** **१२**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी परमेश्वराकडे कोणते पसायदान मागितले आहे?

किंवा

कवी विंदा करंदीकर 'माझ्या मना बन दगड' या कवितेतून कोणता विचार मांडतात?

**४. खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.**

**अ**. श्रीचक्रधर स्वामींनी उमाईसेचे अज्ञान कसे नाहिसे केले? **३**

किंवा

यशंवत मनोहरांनी संविधानाची विज्ञाननिष्ठा कशी स्पष्ट केली?

**ब**. संत नामदेवांनी आपल्या अभंगातून खऱ्या भक्तांची कोणती लक्षणे सांगितली? **३**

किंवा

कवी ग्रेस यांच्या 'पाऊस' या कवितेचा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

**क**. आधुनिक युगात प्रसारमाध्यमांची भूमिका व उद्देश स्पष्ट करा. ३

किंवा

आकाशवाणीवर महिलांकरिता असलेल्या कार्यक्रमाची रूपरेषा कशी असते? ते स्पष्ट करा

ड. **खालील शब्द शुद्ध स्वरूपात लिहा.** ३

| | | |
|---|---|---|
| १. किरतन | २. भाशा | ३. कार्यकरम |
| ४. आशिरवाद | ५. राजकिय | ६. नागपुर |

**५.अ. खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दांत लिहा** ४

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही, असे म्हणावयाला पाहिजे. सुंदर चित्र पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणिण कलावंतांची जरूरी आहे. कलावंतांच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंतांच्या डोळ्यांनी समाज पाहात असतो आणि कलावंतांच्या बुद्धीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षांच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांनाच द्यायला पाहिजे. कलावंतांची कला ही समाजासाठी आहे; आणि कलावंतांवाचून समाज हा सर्वस्वी असाहाय्य आहे.

**ब. नविन पासबुक मिळवण्याकरिता बॅंक व्यवस्थापकाला पत्र लिहा.** ४

**क. खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** ४

The present extract is from Kalama's autobiography "Wings of Fire" struggles of boyhood and youth, bringing alive everyday life in small town in South India and the inspirational role of educators. With characteristic modesty, Kalam ascribes the greatness of his achievements to the influence of his teachers and mentors. The present piece describes his boyhood day in the small town of Rameshwaram and echoes A.L. Tennyson's words : ' More things are wrought by prayer than this world dreams of.'